# जिल्हा परिषद, नंदुरबार
## (आरोग्य विभाग)

नवीन प्रशासकीय इमारत, पहिला मजला, टोकरतलाव रोड, नंदुरबार - ४२५४१२
Email- ri.nandurbar@gmail.com
फोन क्रमांक - ०२५६४-२१०२३५

नंदुरबार दि. ०२/०९/२०२२

जा.क्र./ जिपनं/नवसंजीवनी/ ३०५/२०२२
प्रति

नोडल अधिकारी,
आय. टी. सेल,
जिल्हा परिषद, नंदुरबार

**विषय :-** मानसेवी वैद्यकीय अधिकारी पदभरती करिता www.zpndbr.in या वेबसाईटवर जाहिरात प्रसिद्ध करणेबाबत.

**संदर्भ :-** मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नंदुरबार यांचेकडील मंजूर टिपणी दिनांक ०४/०८/२०२२

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये नंदुरबार जिल्हांतर्गत मानसेवी वैद्यकीय अधिकारी यांची रिक्त पदे भरण्याकरिता दि. २०/०९/२०२२ रोजी पात्र उमेदवारांसाठी थेट मुलाखत (Walk-In-Interview) चे आयोजन करण्यात आले आहे. यास्तव पदभरतीकरिता जाहिरात प्रारुप या पत्रासोबत जोडून देण्यात आहे. तथापि या पत्रान्वये आपणास विनंती कि सदर सविस्तर जाहिरात www.zpndbr.in या वेबसाईटवर दिनांक ०३/०९/२०२२ ते २०/०९/२०२२ पर्यंत प्रसिद्ध करणेत यावी. याबाबतची सॉफ्ट कॉपी ceozpnandurbar@gmail.com या इमेल पत्त्यावर पाठविण्यात आलेली आहे.

(डॉ. गोविंद पंडित चौधरी)
जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, नंदुरबार

प्रत :- माहितीस्तव सविनय सादर
१) मा. जिल्हाधिकारी सो, जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार
२) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी सो, जिल्हा परिषद, नंदुरबार.

NHM
राष्ट्रीय आरोग्य अभियान महाराष्ट्र

नवसंजीवनी योजनेंतर्गत मानसेवी वैद्यकीय अधिकारी
आरोग्य विभाग जिल्हा परिषद, नंदुरबार अंतर्गत
करार तत्वावर कर्मचारी नेमणेकरीता जाहिरात

आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, नंदुरबार अंतर्गत नवसंजीवनी योजनेंतर्गत मानसेवी वैद्यकीय अधिकारी या पदासाठी ११ महिन्याच्या करारतत्वावर तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे पद भरणे आहे.

तक्ता

| अ. क्र. | पदाचे नाव | पदसंख्या | शैक्षणिक अर्हता | आरक्षण | अनुभव | वयोमर्यादा | मासिक मानधन |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मानसेवी वैद्यकीय अधिकारी (११ महिने करार तत्वावर) | एकुण १२ पदे | १)बी.ए.एम.एस.अर्हता धारक २)वैद्यकीय कॉन्सिल कडील नोंदणी प्रमाणपत्र | या पदांसाठी आरक्षण लागु नाही. | कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य. | ३८ वर्षापर्यंत शिथिल | ४००००/- (२२०००/- नवसंजिवनी अंतर्गत + १८०००/- एन.एच.एम.अंतर्गत भत्ता) |

**निवडीची अटी, शर्ती व अर्हता :-**

१. वरील नमुद पदे ही राज्य शासनाची पदे नसुन निव्वळ कंत्राटी स्वरुपाची पदे आहेत. सदर पदावर शासकीय सेवेप्रमाणे असलेले नियम अटी व शर्ती याबाबतचा हक्क व दावा राहणार नाही तसेच या पदासाठी शासनाचे सेवा नियम लागु नाहीत.
२. सर्व उमेदवारांनी A - 4 साईज कागदावर सदर अर्ज टंकलिखीत अथवा संगणकीकृत सोबत जोडलेल्या अर्जाच्या नमुन्यात सादर करणे बंधनकारक राहील.
३. अर्जासोबत :- १) वयाचा पुरावा, २) शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र, ३) आवश्यक शैक्षणिक अर्हतेच्या शेवटच्या वर्षाची गुणपत्रिका, ४) संबंधित पदांकरिता तत्सम कौन्सीलचे नोंदणी प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक राहील. ५) शासकीय/निमशासकीय संस्थांमध्ये केलेल्या कामाचे अनुभव प्रमाणपत्र.
४. दि.३०/०६/२०२२ रोजी पर्यंतचे वय ग्राह्य धरण्यात येईल.

| अ.क्र. | प्रवर्ग | शासन निर्णयानुसार कमाल वयोमर्यादा |
|---|---|---|
| १ | उमेदवाराचे सेवाप्रवेशाची किमान वयोमर्यादा | १८ वर्ष पुर्ण असावेत |
| २ | खुला प्रवर्ग उमेदवारासाठी | ३८ वर्ष |
| ३ | मागासवर्गीय प्रवर्ग उमेदवारासाठी | ४३ वर्ष |
| ४ | राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या सेवेतील कार्यरत उमेदवारांकरीता कमाल प्रवेश ५ वर्षापर्यंत शिथिल राहील. | |

५. उपरोक्त तक्त्यातील उमेदवारांनी दिनांक २० /०९/२०२२ रोजी स. ११ वाजता आपले अर्जासह आरोग्य विभाग, जिल्हा परिषद प्रशासकिय इमारत, टोकरतलाव रोड, नंदुरबार येथे थेट मुलाखतीसाठी (Walk-In-Interview) उपस्थित रहावे.
६. उमेदवारास मुलाखतीस उपस्थित राहण्यासाठी कोणत्याही प्रकारचा प्रवास भत्ता किंवा भाडे देण्यात येणार नाही. तसेच पदासमोर नमुद मानधन हे एकत्रित मानधन असुन त्या व्यतिरीक्त इतर कोणतेही भत्ते देय राहणार नाही.
७. अर्जदार हा संबंधित पदासाठी शारीरिक व मानसिकदृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदाराविरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.
८. कार्यालयात प्राप्त अर्जाचा शैक्षणिक योग्यता व अनुभव या प्रमाणात छाननी करण्यात येईल. अपात्र उमेदवाराचे अर्ज बाद करण्यात येतील. जाहिरातीत नमुद शैक्षणिक अर्हता पेक्षा जास्त शैक्षणिक अर्हता धारण उमेदवारास व जिल्हयाच्या स्थानिक रहिवासी असलेल्या उमेदवारास निवडीसाठी प्राधान देण्यात येईल.
९. निवड झालेल्या उमेदवारास प्रामाणिकपणे कार्यालयीन वेळेत दैनदिन कामकाज करावे लागेल. निवड झालेल्या उमेदवाराचे कामकाज समाधानकारक नसल्यास किंवा कार्यालयीन करार तत्वाच्या अटी व शर्तीचे भंग केले असल्यास त्यास देण्यात आलेले मानधन वसुल करण्यात येईल. तसेच कार्यालयीन मालमत्तेचे नुकसान आढळल्यास त्याची भरपाई जमिन महसुल पध्दतीने करण्यात येईल.

१०. निवड झालेल्या उमेदवारांचे प्रती माह मानधन हे कामकाजाच्या गुणवत्तेवर आधारीत आहे. उमेदवाराचे कामकाज समाधानकारक नसल्यास किंवा कार्यालयीन शिस्तीस अनुसरुन नसल्यास त्याचे मानधन कपात करण्यात येईल. तसेच निवड झालेल्या उमेदवाराने करार कालावधीत विनापरवानगी गैरहजेरी, असमाधानकारक कामकाज, नियमबाहय वर्तन असल्यास त्यास संबंधीत पदावरुन कोणत्याही प्रकारची पुर्व सुचना न देता कार्यमुक्त करण्यात येईल.

११. सदर भरती प्रक्रियेच्या नियम, अटी व शर्ती, पद संख्येत पद स्थापनेच्या ठिकाणात बदल करण्याचे अधिकार, उमेदवारांची गुणानुक्रमानुसार शॉर्ट लिस्टिंग करण्याचे अधिकार हे अध्यक्ष, जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नंदुरबार यांनी आपल्याकडे राखुन ठेवलेले आहे.

१२. भरती प्रक्रियेच्या वेळी निवड समितीवर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या दबाव आणणाऱ्या उमेदवारास किंवा कार्यालयीन कर्मचाऱ्यांना त्रास देण्याचा प्रयत्न करणाऱ्या उमेदवारास त्याच क्षणी भरती प्रक्रियेतुन वगळण्यात येईल.

१३. राष्ट्रीय आरोग्य अभियान सन २०२०-२१ पी.आय.पी.मध्ये काही बदल झाल्यास त्यानुसार वरील पदे कमी जास्त करण्यात येईल.

१४. केंद्र शासनाने सन २०२०-२१ करीता कोणत्याही पदास मान्यता दिली नाही अथवा भविष्यात इतर कोणतीही अपवादात्मक परिस्थिती उद्भवल्यास सदर पदावरील कर्मचाऱ्यांची सेवा कोणतीही पुर्वसुचना वा कोणतेही कारणे न देता तात्काळ संपुष्टात आणली जाईल.

१५. पुर्ननियुक्तीबाबत शासकीय नियमित सेवेत सामावून घेणेबाबत किंवा शासनामार्फत सेवा संरक्षणाबाबत उमेदवारांना कुठलाही दावा करता येणार नाही.

१६. अर्जदारांचा अर्ज अपुर्ण व अर्धवट भरलेला असल्याने नाकारला गेल्यास सर्वस्वी जबाबदारी ही उमेदवारांची राहील.

१७. भरती प्रक्रियेदरम्यान उमेदवाराने चुकीची माहिती सादर केल्याचे, कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे, दबाव तंत्राचा वापर किंवा अनुसूचीत मार्गाचा अवलंब केल्याचे आढळुन आल्यास कोणत्याही टप्प्यावर त्याची उमेदवारी/नियुक्ती कोणतीही पुर्वसुचना न देता रद्द करण्यात येईल.

१८. निवड झालेल्या उमेदवारास करारतत्वावर अटी व शर्ती मान्य असल्या बाबत रु. १००/- च्या स्टॅप पेपर वर करारनामा लिहुन देणे बंधंन कारक राहील.

१९. वरील रिक्त राहिलेल्या पदांसाठी दरमहा पहिल्या सोमवारी थेट मुलाखत (Walk-In-Interview) घेण्यात येईल. सदरील दिवशी शासकीय सुटी असल्यास दुसऱ्या दिवशी मुलाखत घेतली जाईल.

२०. भरती प्रक्रियेत संपुर्ण अधिकार, पदे कमी-जास्त करणे, भरती प्रक्रिया रद्द करणे, अटी व शर्तीमध्ये बदल करणे, पदस्थापनेच्या ठिकाणीमध्ये बदल करणे, इत्यादी सर्व अधिकार हे या कार्यालयाचे असून निवड प्रक्रियेत कोणत्याही क्षणी बदल करण्याचे अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नंदुरबार यांनी राखुन ठेवले आहेत.

सदस्य सचिव
जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी तथा
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद, नंदुरबार

अध्यक्ष
जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब व कल्याण सोसायटी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद नंदुरबार

**Health Department, Z.P.Nandurbar Dist- Nandurbar**
**Recruitment for post of Mansevi Medical Officer on contractual basis**
**Unders Navsanjivani Scheme.**

## Application form

*(All fields in the forms are mandatory to be filled. An incomplete form submitted will be treated as rejected.)*

| | | | | |
|---|---|---|---|---|
| Exact Name of Position applied for :- | | | | Applicants Photo |
| Name: | | | | |
| Father's / Husband's Name: | | | | |
| Date of Birth (DD/MM/YYYY): | Blood Group: | Gender: | | |
| Marital Status: | Nationality: | Religion:<br>Category: | Applying for which category | |

Address / Contact Details: (Name of the District and Pin code is compulsory)

| | |
|---|---|
| Address (Present):<br><br>State:<br>Pin:<br>Contact No: | Address (Permanent): (Write Same if same as Present Address)<br><br>State:<br>Pin:<br>Contact No: |
| E-mail Id for Correspondence: | Registration Number of Medical Council :- |

| Languages Known: (Write "Y" / "N") | English | Hindi | Marathi | Others (Please Specify below) |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |

| |
|---|
| Computer Proficiency: |

Academic / Professional Education Summary: (Starting from most recent)

| From (MM/YY) | To (MM/YY) | Degree / Diploma | university / Institute | Specialization / Subjects | Final Year Total Marks & Obtained Marks | Final Year Percentage |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

Work / Experience Summary: (Starting from current / most recent)

| Sr. No | From (MM/YY) | To (MM/YY) | Organization | Designation | Total Experience Month:- Year:- |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

**Total Govt. Experience (In Years & Months):**

| | |
|---|---|
| | **Notice Period/Joining Time (Days):** |

Details of Internship / Workshops/Conferences/Trainings Attended (If any):

***Declaration:***

*I hereby declare that all statements made in the application are true, complete and correct to the best of my knowledge and belief. I understand that in the event of any information being found untrue/false/incorrect or I do not satisfy the eligibility cri teria my candidature will be cancelled, without assigning any reason thereof. I have read the content of the advertisement and agree to abide by the rules,*

Name

Place

Date :

Signature

**Disclaimer:**

The applicants are required to submit the duly filled application on or before the due date and time, failing which the application of the said applicant shall be treated as non-responsive. Z.P.Nandurbar shall not be responsible for late receipt or non-receipt of application/s for any technical reason or whatsoever. The applications received after due date and time shall not be considered.